IMPACT FACTOR:4.197(IIJIF) ISSN: 2454-5503

# CHRONICLE

## OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES (CHCS)

VOL. 5 NO. 5 SPECIAL ISSUE OCTOBER 2019

A Peer Reviewed Bimonthly International Journal

Special Issue On

# IMPACT OF SOCIAL MEDIA ON SOCIETY

(Book 2)

*Guest Editor*

**Dr. Vasant Satpute**

*Associate Editor*

**Dr. M. D. Kachave**

*Assistant Editors*

**Dr. B. V. Andhale**

**Dr. M. G. Somvanshi**

**Dr. A. B. Sarkale**

*Mahatma Gandhi Education and Welfare Society's*

CENTRE FOR HUMANITIES AND CULTURAL STUDIES, KALYAN (W)

www.mgsociety.in +91 8329000732 Email: chcskalyan@gmail.com

**Full Journal Title:** Chronicle of Humanities & Cultural Studies(CHCS)
**Print ISSN:** 2454-5503
**Impact Factor:** 4.197 (IIJIF)
**Frequency:** Bimonthly / **Language:** Multi language / Journal
**Country/Territory:** India
**Publisher:** Director, Centre for Humanities & cultural Studies, A-102, Sanghavi Regency, Sahyadrinagar, Kalyan (W) (MS). Email: [illegible]

*Guest Editor*

**Dr. Vasant Satpute,** Principal, L. R. W. College, Sonpeth, Dist. Parbhani

*Associate Editor*

**Dr. M.D. Kachave,**Co-ordinator, NSS, L. R. W. College, Sonpeth, Dist. Parbhani

*Assistant Editor*

**Dr. B. V. Andhale,** Dept. of Pol. Sci., L. R. W. College, Sonpeth, Dist. Parbhani
**Dr. M. G. Somvanshi,** HoD, Pub. Adm., L. R. W. College, Sonpeth.
**Dr. A. B. Sarkale,** Librarian, L. R. W. College, Sonpeth, Dist. Parbhani

*Chief Editor :*

**Dr Kalyan Gangarde,** Director, Centre for Humanities and Cultural Studies, Kalyan (W)

*Executive Editor*

**Dr Grishma Khobragade,** Asst. Prof., Birla College, Kalyan (W)

*Co- editors*

**Dr Vishnu Patil,**Asst. Professor, Deogiri College, Aurangabad
**Dr Pandurang Barkale,** Asst. Professor, Dept of English, SNDT Women's University, Churchgate, Mumbai
**Dr Bharat Gugane,** Asst. Professor, Bhosala Military College, Nashik, Maharashtra
**Dr Dashrath Kamble,** Asst. Professor, S.B.College, Shahapur, Dist. Thane, Maharashtra
**Dr Sachin Bhumbe,** Asst. Professor, P. N. Doshi College, Ghatkopar, Mumbai

## EDITORIAL ADVISORY BOARD

Aju Mukhopadhyay,
Dr R.T. Bedre,
Dr (Mrs.) Smita R. Nagori,
Dr Arvind Nawale
Dr Rajiv Kumar,
Dr Kailash Nimbalkar,
Tsai-ching Yeh
Dr B. N. Gaikwad,
Dr Simon Philip,
Dr Binu Anitha Josheph
Dr Ramkishan Bhise

**Subscription Rates**

| | |
|---|---|
| Annual Membership (Individual) | ₹ 1,800 |
| Bi-annual Membership | ₹ 3,500 |
| Institutional Annual Membership | ₹ 2,200 |
| Institutional Bi-annual Membership | ₹ 4,200 |
| Annual Membership for Foreigners) | $150 |

DISCLAIMER: Academic facts, views and opinions published by authors in the Journal express solely the opinions of the respective authors. Authors are responsible for their content, citation of sources and the accuracy of their references. The editorial board or Editor in chief cannot be held responsible for any lacks or possible violations of third parties' rights.

४३. समाज माध्यमं आणि समाज / डॉ. मिरा वि. फड | 198
४४. सोशल मिडिया ही तत्कालीन परिस्थितीत काळाजी गरज / डॉ. गंगणे आर. व्ही. | 202
४५. सोशल मिडियाच्या माध्यमातून होणारे लैंगिक गुन्हे / डॉ.शिवाजी परळे | 208
४६. समाजमाध्यमांचा समाजावरील प्रभाव / बांगर नितीनकुमार बा .| 215
४७. सोशल मिडिया आणि फेकन्युज / डॉ. आंधळे वी. व्ही. | 218
४८. समाज माध्यमाचे दुष्परिणाम / डॉ. जाधव अशोक का. | 221
४९. छावा व किशोर मासिकाने प्रसिध्द केलेल्या साहित्याचा विषयनिहाय व साहित्य निहाय अभ्यास / अशोक मा. बांगर | 225
५०. मुलांच्या मुद्रित प्रसार माध्यमातील साहित्याची मुलांसाठीची उपयुक्तता / अशोक मा.बांगर | 228
५१. सामाजिक माध्यमांचे परिणाम व उपाय / डॉ.भिसे आर.एम. | 231
५२. सोशल मिडीया : मानवी जीवनावर पडलेला प्रभाव / डॉ.कोटीवाले व्हि.एम. | 236
५३. प्रसारमाध्यमे : स्वरूप, उद्‌गम आणि विकास / डॉ.सा.द.सोनसळे | 239
५४. व्यक्तिसंबंधावर सोशल मिडीयाचा प्रभाव : बिघडते सामाजिक संबंध / वंदना गायकवाड | 243
५५. सोशल मीडियाचा समाजमनावरील दुष्परिणाम : एक अभ्यास / डॉ. रामानंद बा. व्यवहारे | 247
५६. सोशल मिडिया का समाज पर प्रभाव / बांगर आकाश शे. | 255
५७. समाज और सोशल मीडिया / डॉ.मारोती उ. खेडेकर | 259
५८. विश्वभाषा हिन्दी और मिडिया / डॉ.कुलकर्णी वनिता वा. | 262
५९. सोशल मीडिया और सामाजिक संबंधोंपर सैद्धांतिक नजरिया / विनय कुमार | 269
६०. सोशल मीडिया रिपोर्टिंग का सवाल / डॉ. वडचकर एस.ए. | 273

48.

# समाज माध्यमाचे दुष्परिणाम

प्रा.डॉ. जाधव अशोक काकासाहेब
कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ जि. परभणी

माध्यमांना त्या-त्या काळात समाज विकासाचे प्रतिक मानण्यात आले. माध्यमं विविध माहितीच्या प्रचार, प्रसार आणि मनोरंजनाची उत्तम साधने आहेत. मौखिक, चित्रित व नाट्य यातून लिखित, श्राव्य व दृकश्राव्य अशी माध्यमांची प्रगतीहोत गेली, मुखोद्गत पुराणकथेतूनशेकडो वर्ष रामायण व महाभारत पुढील पिढ्यापर्यंतपोहचविण्यात आले.आधुनिक काळात गटेनबर्ग या व्यक्तीने छापखान्याच्या तंत्रज्ञानातूनलिखित माध्यामाद्वारेमाहितीचा प्रचार, प्रसार आणि मनोरंजनाच्या क्षेत्रातप्रगती केली. २० व्या शतकातश्राव्य म्हणजेच रेडिओ आणि दृक् म्हणजेचदुरदर्शनमाध्यमाचा उदय झाला.हि दोन्ही माध्यमेत्या काळातील तंत्रज्ञानाचा भाग होता.परंतू सध्या डिजिटल माध्यम आतापर्यंतच्या सर्व माध्यामांवर वरचढ ठरत आहे.तंत्रज्ञानाधारित डिजिटल माध्यमाचा विलक्षण जगदगतीने विस्तार होण्यात सामाजिक माध्यमे महत्वाची भुमिका पार पाडीत आहेत.यामुळे पुर्वीची समाज माध्यमे जसे, भजन, किर्तन, नाटक, गायन अशा कार्यक्रमाकडेयुवा पिढी सध्या थेटहजेरी लावत नसल्याचे दिसून येते.परंतूतेचकार्यक्रमई-माध्यमाद्वारेमोठ्याप्रमाणात पहात आहेत.दिवसेंदिवस समाज माध्यमाद्वारे माहिती मिळविणे, तयार करणे, पाठविणे, त्याची अपापसात देवाण-घेवाण करणाऱ्यांची संख्या कोटींनी वाढत आहे.आज भारतात ३७ कोटी लोक समाज माध्यमांचे वापरकर्ते आहेत.स्टॅरिस्टा वेबसाईटच्या मते, येणाऱ्या काही वर्षात भारतातील समाज माध्यमाच्या वापरकर्त्यांची संख्या ५० कोटीच्या जवळपास असेल. म्हणजे समाज माध्यम घराघरात वापरले जाईल असा अंदाजव्यक्त केला जातो.

अशा परिस्थितीत समाज माध्यम कसे वापरावे, त्याचे अनुकूल व प्रतिकुल परिणाम कायहोतील, त्याला नियंत्रणात कसे ठेवता येईल, तरूण-तरूणीयाचा वापर का?कसा?व कशासाठी करतीलअसे अनेक प्रश्न निर्माण होतात.समाज माध्यमाद्वारे कोणतीही व्यक्ती हवी ती माहिती प्रसारित करू शकते.समाजोपयोगी माहिती पाठविल्याने समाजाच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व सांस्कृतिक विकासात भरच पडणार आहे.त्याकरिता समाज माध्यम वापरकर्त्यांनी प्रसारीत केल्या जाणाऱ्या मुद्रीत, चित्रित, व्हिडीओ इ.चासारासार विचार करणे आवश्यकठरते. कारण बनावट व खोट्या माहितीमुळे समाजात दहशत पसरविणे, सामाजिक एकात्मतेत बाधा निर्माण करणे, राष्ट्रहित व रक्षण धोक्यात आणने, एखाद्याचे वैयक्तिक जीवनात हस्तक्षेप करणे, समाज माध्यमाद्वारे बदनामी करण्याची

भिती दाखवून खंडणीची मागणी करणे, एखाद्यास वेठीस धरणे, अश्लिल चित्रफिती पहाण्याने छेडछाड व बलात्कारासारख्या गुन्ह्यात वाढ होणे इ. प्रकार घडत आहेत.त्यातून प्रशासन व समाजापुढे नवी आव्हाने निर्माण होत आहेत.सर्व प्रकारचे आर्थिक व्यवहार ऑनलाईनझाल्यामुळे सायबर गुन्हेगाराकडून चोऱ्यांच्या प्रमाणात वाढ होत आहे.

**उद्देशः**- प्रस्तुत शोधनिबंध खालील उद्देशाला अनुसरून लिहिण्यात आला आहे.

१) समाज माध्यमाचा अर्थस्पष्ट करणे.

२) समाज माध्यमांच्या वापरावर प्रकाश टाकणे.

३) समाज माध्यमांचे प्रकार पहाणे.

४) समाज माध्यमांच्या दुष्परिणामाचा अभ्यास करणे.

**अभ्यास पद्धती** -प्रस्तुत शोध निबंध लिहीण्यासाठीदुय्यम साधन सामग्रीचा अवलंब करण्यात आला आहे.यात विविध ग्रंथ, संदर्भ ग्रंथ, मासिके, दे.वर्तमान पत्रे व संकेतस्थळे इ.चा समावेश आहे.

**अर्थ** -अँड्रीस कॅप्लन व मिशेल हानलेईनच्या मते, सोशल मिडिया म्हणजे, विशिष्ट विरधारा आणि पाया यावर आधारित इंटरनेटच्या वापरातून तयार झालेला गट म्हणजेसोशल मिडियाहोय. अर्थात पुर्वी माहितीच्या जाळयाचा वापर केवळ संगणकाच्या माध्यमातून केला जात होता. परंतू आता मोबाईल व वेबवर आधारित तंत्रज्ञानाचा अशा व्यासपीठासाठी समाज वापर करित आहे. एखाद्या गोष्टीत अनेकांना सहभागी करून घेणे, संयुक्तपणे एखादी माहिती निर्माण करणे, त्यावर चर्चा करणे, तिची देवाण-घेवाण करणे यासाठीसोशल मिडिया या व्यासपीठाचा उपयोग केला जात आहे. याचा प्रयोग १९९० च्या दशकात केला गेला.१९९४ मध्ये जिओसिटीजही पहिलीसोशल मिडियासाईट निर्माण केली. प्रमुखसहा शहरातील लोकांनी या साईटचा उपयोग करून स्वत:ची वेबसाईट निर्माण करावी अशीत्यामागचीकल्पनाहोती. परंतू आता सोशल मिडियात झपाट्याने वाढ झालेली आहे.त्याच्या वापरकर्त्यांची संख्या प्रचंड वाढलेली आहे.व्यक्तिगत, राजकीय, विविध शासकीय व खाजगी संघटनांच्या पातळीवर, औद्योगिक पातळीवर किंवा समाज घटकाच्या पातळीवर माहिती व विचाराच्या देवाण-घेवाणीसाठी समाज माध्यमाचा वापर होत आहे. जुलै २०११ साली अमेरिकन नोकांनी ८८ अब्ज मिनिटे वेळ वेगवेगळ्या सोशल मिडियासाठी खर्च केला .जुलै २०१२ मध्ये १२१ अब्ज मिनिटे वेळ सोशल मिडियासाठी दिलाहोता.

**प्रकार** - सध्या तरूणवर्गात फेसबुक व व्हॉट्सअप या सोशल मिडियानी खूपच आवड निर्माण केलेली आहे.याशिवाय फेंडस्टर, हाय५, आर्कुट, मायस्पेस, लिंक्डइन, यु-ट्युब, ट्विटर, इंन्स्टाग्राम इ.समाज माध्यमेआहेत.या मिडियाचा वापर योग्य कारणांसाठीहोणे अपेक्षित आहे.परंतू सध्या त्याचा वापर अयोग्य पद्धतीने व अयोग्य

कारणांसाठी केला जात आहे.त्यामुळेत्याचे अनेक दुष्परिणाम दिसून येत आहेत.ते पुढील प्रमाणे

**माध्यम निवड -** सोशल मिडियाचे खुप मोठे व्यासपीठ उपलब्ध असल्यामुळे व त्याचे अनेक प्रकारअसल्याने कोणते व किती माध्यमाची निवड करावी हेसमाजासमोर मोठे आव्हान आहे. या सर्व माध्यमामध्ये आंरतसंबंध निर्माण करणे अडचणीचेठरत आहे.

**सत्य-असत्याची पडताळणी-**सोशल मिडियाद्वारे प्रसारित केली जाणारी माहितीसत्य की असत्य आहे याची पडताळणी करण्याचे आव्हान निर्माण होत आहे. काही वेळेस बनावट व खोटी माहिती प्रसारित केली जाते. ब्राझीलमध्ये झिकाहा जीवघेणा आजार पसरला असता या आजाराबद्दल व्हिडीओद्वारा चुकिची माहिती प्रसारित केली गेलीती खरीसमजून लोकांनी योग्य औषधोपचार घेण्याचे टाळले व आजाराचा प्रादुर्भाव वाढत गेला.

**वैयक्तिक जीवनाचे सार्वत्रिकरण-** सोशल मिडियाच्या माध्यमातून एखादी व्यक्ती एखाद्या दुसऱ्या व्यक्तीच्या वैयक्तिक जीवनाच्या चित्रफिती व चित्राद्वारे किंवा लिखित स्वरूपात सार्वत्रिकरण करित आहेत. यामुळे अनेकांनाबदनामी व बेअब्रूला सामोरे जावे लागत आहे. काही वेळा अश्लिल फोटो व व्हिडीओ व्हायरल केले जात आहेत. यावर नियंत्रण मिळवणे कठिण बनलेले आहे.

**सामाजिक एकात्मतेस बाधा -** समाजात एखादी घटना घडली असता त्याचे विडंबन करून प्रसारित केली जाते. एखाद्या सौम्य घटनेला रंजक बनवून प्रसारित केल्यामुळे समाजभावना दुखाउनत्याचे समाजावर वाईट परिणामहोत आहेत.परिणामी सामाजिक एकात्मतेला धोका निर्माण होतो. भारतासारख्या अनेक जाती-धर्माच्या राष्ट्रात समाज माध्यमाद्वारे फुट पाडण्याचे अनेक वेळा प्रयत्न झाल्याचे दिसून येते.

**राष्ट्राच्या संरक्षणास धोका -** समाज माध्यमेही जागतिक व्यासपीठे आहेत. राष्ट्रसंरक्षणाच्या संदर्भातील गुप्त माहिती समाज माध्यमाद्वारे प्रसारित केली जाते. आपल्या राष्ट्रातील भौगोलिक माहिती, काही दस्ताऐवज, दारूगोळ्याचे कारखाने इ. माहिती व्हायरल केल्यामुळेती माहिती इतर राष्ट्रातील समाजविघातक कृत्ये करणाऱ्या व्यक्ती किंवा संघटनांनासहज मिळते. त्यामुळे देशाच्या संरक्षणास धोका निर्माण होण्याचे प्रमाण वाढत आहे.

**विश्वासार्हतेचा प्रश्न -**समाज माध्यमाद्वारे बऱ्याचदा चुकीचे व बनावट शासन निर्णय, दस्ताऐवज, एखाद्या घटनेचेप्रक्षोभक वर्णन प्रसारित केले जाते. त्यामुळे समाज माध्यमासंदर्भात विश्वासार्हतेचा प्रश्न निर्माणझालेला आहे.

**अश्लिलता -**भारतीय समाजाची सभ्यता समाज माध्यमामुळे नष्टहोत चालली आहे. यु-ट्युब, फेसबुक, व्हॉट्सअप आणि इतर तत्सम माध्यमाद्वारे अश्लिल चित्र व चित्रफितीव्हायरल केल्या जातात. याला पौगंडावस्थेतील मुले- मुली वतरूण वर्ग

बळी पडत आहे. शिक्षण घेण्याच्या वयातच तरूण पिढीविध्वंसक मार्गाकडेजात असल्याचे दिसून येते. मुले भावनिक होवून छेडछाड, बलात्कार, खंडणी मागणे असे प्रकार घडतआहेत.

**शैक्षणिक नुकसान -** शालेय व महाविद्यालयीन मुलेसोशल मिडियावर अनेक तास गेम खेळण्यात मग्न असतात आणि अभ्यासाकडे दुर्लक्ष करतात.त्यामुळे मुलांचे शैक्षणिक नुकसानहोते. एवढेच नाहीतर अनेक मुलांनाआपला जीव गमवावा लागल्याची, काही मुलेमनोरूग्ण बनल्याची तर काही मुलांना बौद्धीक अपंगत्व आल्याचीउदाहरणे आहेत...................

दुरावा - समाज माध्यमात व्यक्ती सतत व्यस्त रहात असल्यामुळे मानसा-मानसातील प्रत्यक्ष सहवासाची ओढ कमीहोत आहे.तसेच मानसातील एकलकोंडेपणाचे प्रमाण वाढत आहे.

सारांश, समाज माध्यम विचारांची देवाण-घेवाण करण्याचे एक उत्तम साधन आहे.परंतूत्याचा समाजातील काही व्यक्तीकडून गैरवापर होत आहे.या माध्यमाचा वापर कसाकरावा हे त्या-त्या व्यक्तीच्या मानसिकतेवर अवलंबून आहे. समाजाला कोणती व कशी दिशा द्यायचीहे माध्यम वापरकर्त्यांने ठरवावे लागेल. समाज माध्यमाचा समाजावर वाईट परिणामहोणार नाही याची सर्वांनी काळजी घेणे आवश्यक आहे. ब्राझीलसारख्या देशात यु-ट्यूबद्वारा समाजात फुट पाडून एक विशिष्ट राजकीय पक्ष निवडणुक जिंकतो.म्हणजे समाज माध्यमे लोकशाहीला मारक कीतारक आहेतहा प्रश्न निर्माण होतो.प्रक्षोभक व्हिडीओ व्हायरल करूनसमाजात जातीय व धार्मिक विष पेरण्याचे काम काही व्यक्तीकडून केले जात आहे.अशा माध्यमामुळे गुगलच्या नैतिकतेवर प्रश्न चिन्ह निर्माण झालेला आहे.थोडक्यातभारतासारख्या खेडेप्रधान देशातील अल्पशिक्षीत समाज समाज माध्यमावरील माहितीच्या खऱ्या-खोट्याची चिकित्सा न करता त्याला बळी पडत आहे.त्यातून समाजहिताऐवजी समाज विघातक कृत्ये घडून येत आहेत.

संदर्भ -


१) कुमार अरविंद - इंटरनेट जर्नालिजम, अनमोल प्रकाशन, नई दिल्ली

2) Andreas M. Kaplan and Michael Heanlein - Journal of Systems and Information Technology - ISSN: 1328-7265, 27 April 2012

३) सरदाना चंद्रकांत - जनसंचार कल, आज और कल, ज्ञानगंगा प्रकाशन, नई दिल्ली

४) बोराटे योगेश- सोशल मिडीया २०१९, अर्थव पब्लिकेशन्स, धुळे

५) योजना (मासिक) - हिन्दी सप्टेंबर २०१२

६) प्रतियोगीता दर्पण हिन्दी मासिक, मार्च २०१३

७) दै. लोकसत्ता दि. १८ सप्टेंबर २०१९


□□□